# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०२/२०२२ (रविवार)

---

## पोस्टे सावनेर हद्दीत हातभट्टी मोहाफुल दारू गाळणा—या आरोपीस अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई
### एकुण ४२,०००/—रू चा माल मुद्देमाल जप्त.

दिनांक २६.०२.२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोस्टे सावनेर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मुखबीरद्वारे बातमी मिळाली कि, पाटनसावंगी येथे राहणारा सुरेश डोमाजी मन्ने रा पाटनसावंगी हा सावनेर हद्दीतील ईटनगोटी शिवारात मोहाफुल दारू गाळत आहे. अश्या मिळालेल्या माहीतीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने नमुद ठीकाणी छापा टाकला असता यातील आरोपी सुरेश डोमाजी मन्ने हा ईटनगोटी शिवारात दारूची भट्टी लावुन दारू गाळतांना मिळुन आला असता. त्याचे ताब्यातुन खालीलप्रमाणे माल जप्त केला.

१) ६ नग प्लास्टीक ड्रम मध्ये ५० लिटर मोहाफुल सडवा एकूण ३०० लिटर असा एकूण कि. ३०,०००/— रू चा माल
२) २० लिटर गावठी मोहाफुल दारू प्रती लिटर १०० रू. असा एकूण किमती २,०००/— रू चा माल
३) ७ नग खाली प्लास्टीक ड्रम ७,००० रू चा माल
४) १ नग लोखंडी ड्रम १,००० रू चा माल
५) २ टन जलाउ लाकूड व ईतर साहीत्य एकूण २,००० /—रू असा एकूण किमती ४२,०००/— रू चा माल

सदर प्रकरणात पोस्टे सावनेर येथे आरोपीविरूध्द कलम ६५ (बी) (सी) (ई) (एफ) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वयें गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपी नामे— **सूरेश डोमाजी मन्ने वय ६३ वर्ष रा वार्ड क्र ०१ पाटणसावगी ता सावनेर यास अटक करण्यात आली आहे.** पुढील कारवाई करीता पो स्टे सावनेर यांना देण्यात आले.

सदरची कार्यवाही स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस हवालदार राजु रेवतकर, पोलीस नाईक आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांचे पथकाने केली.

(सदर बातमीचा फोटो सोबत पाठविला आहे)

## कंटेनर मधुन चोरी

**पोलीस स्टेशन देवलापार :–** अंतर्गत मौजा पवनी ७ किमी दक्षिण.यातील. यातील फिर्यादी कंटेनर चालक हा आपले कंटेनर क्र.एच आर– ४७ डी– ८६२६ बाटा इंडिया लिमिटेड कंपनीचे फुटवेअर माल गुडगाव हरियाणा येथुन ५५३ बॉक्स लोड करून होसुर तमिलनाडु येथे जात असता यातील फिर्यादीस गाडी चालवतांनी झोप आल्याने नागपुर जबलपुर हायवे रोडवर मौजा पवनी येथे रोडच्या बाजुला आपले वाहन उभे करून फिर्यादि व क्लिनर पंकज यादव आपले वाहनात झोपले असता, कटेनर मधुन कोणीतरी ५५३ बॉक्स फुटवेअर पैकी फुटवेअर प्रत्येकी बॉक्स कि. १,०००/– रू असा एकुण कि. ३५,०००/ रू चा मुदेमाल दिनांक २६/०२/२०२२ चे सकाळी ०३/३० वा. ते ०९/०० वा. दर. अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – अजयकुमार रामलाल यादव वय २४ वर्षे रा. पुरे चुनु महाराजगंज जि. रायबरेली उत्तर प्रदेश यांचे रिपोर्टवरून पोस्टे देवलापार येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास संदीप नागोसे मो क्र ७९७२२१२१३२ पो स्टे देवलापार हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बेला :–** अंतर्गत मौजा सोनेगांव डीवायडर कट रस्ता ८ कीमी पश्चिम. यातील आरोपी कार चालकाने आपली मारूती सुझुकी कार क्रमांक एम एच २९ एडी १६७९ भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मो.सा क्र. एम पी ५० एम सी ०१२८ ला धडक मारून अपघातात मोटर सायकल स्वार जितेंन्द्र संभलवार याचे मरणास व जोंगेंन्द्र कील्लारे याचे जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोलीस अंमलदार अजय चौधरी पो.स्टे बेला यांचे रिपोर्टवरून मारूती सुझुकी कार क्रमांक एम एच २९ एडी १६७९ चे चालकावर पोस्टे बेला येथे कलम २७९,३३७,३०४ (अ) भादवि. सहकलम १८४ मो वा का प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार अजय चौधरी पोस्टे बेला मो नं ९८२३१८६६८६ करीत आहेत.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन मौदा :–**अंतर्गत ब्लेस हॉस्पीटल जवळ १ कीमी पुर्व मौदा. यातील फिर्यादी हे बाजार करण्याकरीता गेले असता फिर्यादीने आपली मो सा क्र एच एच ३६ एएम ६८९२ कि. ४०,०००/– रू ची ब्लेस हॉस्पीटल जवळील जुने डि डी भोयर कॉलेज समोरील जागेत हॅन्डल लॉक करुन फिर्यादी बाजारात गेले असता परत आलेवर फिर्यादीला सदर मोटर सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन न आल्याने कोनीतरी अज्ञात आरोपीने सदर मोटर सायकल नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल मुरलिधर धावळे वय २६ वर्ष रा खरबी यांचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार गौतम मेश्राम मो क्र ९८२२५४५१६९ हे करीत आहे .

**पोलीस माहीती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**